**सं.फौ.प्र.क्र.३६९५/२०२३.**
**सचिन वि. मनीषा**
**निशाणी क्रं. ३३ वर पुढे**

**नांव :- वंदना सचिन भागवत,**
**वय :- ४० वर्ष, व्यवसाय :- घरकाम,**
**रा. :- देहुरोड, पुणे.**

**<u>तक्रारदार तर्फे साक्षीदार क्र. ०२ यांचा पुढील सरतपास शपथेवर सुरू मार्फत विधीज्ञ श्रीमती सपना भालेराव.</u>**

**०१.** आरोपी क्र. ०१ ही माझी सन २००९ पासुन मैत्रीण होती. आरोपी क्र. ०१ यांना मी वेळो वेळी हातउसने रक्कम वापरण्याकरीता दिलेले आहे. आरोपी क्र. ०१ यांना मी घर विकसीत करण्याकरीता वेळो वेळी पैसे दिले आहे. आरोपी क्र. ०१ यांना मी व माझे पती यांनी रू. तीन लाख रोख स्वरूपात सन २०१५-१६ साली घराचे बांधकाम करण्याकरीता दिलेले असून आरोपीने मला घ राचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर व घर विकसीत झाल्यानंतर पैसे परतफेड करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानंतर मी आरोपीस वेळो वेळी रक्कम परतफेड करणेविषयी विचारणा केली असता आरोपीने परतफेड करण्यास टाळाटाळ केली. त्यानंतर शेवटी आरोपीने दि. ११/०८/२०२३ रोजी रू. तीन लाखाचा धनादेश कर्जाच्या परतफेडीकरीता दिला. परंतु सदर धनादेश बॅकेत जमा केला असता न वटता परत आला. त्यामुळे प्रस्तुतची तक्रार दाखल केलेली आहे.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. अमोल देसाई यांच्यामार्फत.</u>**

**०२.** हे म्हणणे खरे आहे की, मी व आरोपी चांगल्या मैत्रीणी आहोत. मी आरोपीस वेळो वेळी मदत करीत होते परंतु आरोपी मला कधीही मदत करीत नव्हते. मी आरोपीस घराचे कागदपत्र अपुर्ण असल्याने पुर्ण करण्याकरीता पुर्ततेकरीता लागणा-या खर्चासाठी पैसे दिले होते. मी पैसे आरोपी क्र. ०१ यांना दिले होते. मी माझ्या खात्यातून पैसे दिलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, व्यवहार हा मी व आरोपी क्र. ०१ यांच्यामध्ये होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. ०१ यांचा माझ्या पतीसोबत कोणताही व्यवहार झालेला नव्हता. हे

म्हणणे खरे नाही की, मी आरोपीकडुन उसनवार पावती लिहुन घेतली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला कोणताही धनादेश दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपुर्ण मजकुर खोटा नमुद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास काही नाही.**

दि. २३/०३/२०२६

**साक्षीदारास वाचून दाखविले व बरोबर असल्याचे मान्य केले.**

ABHAY MALLIKARJUN VIBHUTE
Digitally signed by ABHAY MALLIKARJUN VIBHUTE
Date: 2026.03.24 10:50:27 +0530

**(अभय म. विभुते)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
वडगांव मावळ, पुणे.

**श्रवणोत्तर स्विकृत,**

ABHAY MALLIKARJUN VIBHUTE
Digitally signed by ABHAY MALLIKARJUN VIBHUTE
Date: 2026.03.24 10:50:32 +0530

**(अभय म. विभुते)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
वडगांव मावळ, पुणे.